पथविक्रेता निवडणुकीसाठी आरक्षण सोडत करण्याच्या पद्धतीबाबत..

# नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
# ७ वा मजला, बेलापूर भवन,
# सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

परिपत्रक क्र. न.प्र.सं./फेरीवाला धोरण/का.१०/२०२२-२३// 2262

दिनांक : 13 APR 2023

परिपत्रक

संदर्भ: १. पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६
२. पनवेल मनपा यांचे पत्र क्र. DAY-NULM/SUSV/२४२१/प्र.क्र./३५/१७४/२०२३ दि. १०/०३/२०२३

पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मधील प्रकरण ४ (११) यामध्ये नगर पथविक्रेता समितीची रचना देण्यात आलेली आहे. यामध्ये शासकीय विभागाचे ५ सदस्य, इतर मंडळाचे १५ सदस्य आहेत. इतर मंडळामध्ये अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना २ सदस्य, निवासी कल्याण संघ २ सदस्य, व्यापारी संघाचा प्रतिनिधी १ सदस्य, पणन संघाचा प्रतिनिधी १ सदस्य, अग्रणी बँकेचा प्रतिनिधी १ सदस्य व पथविक्रेते प्रतिनिधी ८ सदस्य.

पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१६ मध्ये पथविक्रेते सदस्य यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक आणि विकलांग व्यक्ती यांच्या योग्य प्रतिनिधीत्वासह एक तृतीयांश महिला विक्रेत्या असतील असे नमूद केले आहे. पथविक्रेत्यांची निवडणूक कामगार आयुक्त कार्यालयामार्फत घेणेबाबत सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पथविक्रेता निवडणुकीमध्ये आरक्षण सोडत कशाप्रकारे करण्यात यावी याची विचारणा होत आहे. उपरोक्त संदर्भ २ च्या त्याअनुषंगाने पुढील प्रमाणे पद्धत देण्यात येत आहे.

## पथविक्रेता निवडणुकीसाठी आरक्षण सोडत करण्याची पध्दत

पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मधील प्रकरण ४ (११) यामध्ये नगर पथविक्रेता समितीची रचना देण्यात आलेली आहे. यामध्ये पथविक्रेत्यांचे ८ सदस्य पुढील प्रमाणे निवडणुकीद्वारे नियुक्त करण्यात यावेत.

- अनुसाचीत जाती - १
- अनुसूचित जमाती -१
- इतर मागास वर्ग -१
- अल्पसंख्यांक - १
- विकलांग व्यक्ती -१
- खुला प्रवर्ग -३ ( एक महिला)

महिलांसाठी आरक्षित ठेवण्याच्या ३ जागांपैकी उरलेल्या २ महिला राखीव जागांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक आणि विकलांग व्यक्ती या प्रवर्गांमधून चिठ्ठी सोडतीद्वारा दोन जागा निश्चित कराव्यात. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी या पद्धतीद्वारे आरक्षण सोडत करावी. कामगार आयुक्त कार्यालयाने पथविक्रेता निवडणूक विहित वेळत होण्याची दक्षता घ्यावी.

(डॉ. किरण कुलकर्णी)
आयुक्त तथा संचालक
समन्वयन अधिकारी
फेरीवाला धोरण
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत :

१. कामगार आयुक्त, कामगार भवन, ४ था मजला, सी-२०, ई ब्लॉक,बीकेसी, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
२. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
३. आयुक्त, सर्व महानगरपालिका.
४. प्रादेशिक सहआयुक्त, सर्व विभागीय आयुक्त कार्यालय
५. जिल्हा प्रशासन अधिकारी, सर्व जिल्हे
६. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती